# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

विषय : मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आयोजित करण्यात आलेल्या मुलाखतींच्या अनुषंगाने राबविण्यात आलेल्या निवड प्रक्रियेबाबत.

संदर्भ : १. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.२६०२१/२०२५ व इतर संबंधित याचिकांमध्ये दिलेला दिनांक ०८/०९/२०२५ चा निर्णय.
२. संदर्भ क्र.सीसीओ/५२०९ दि.१६/१२/२०२५.

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.२६०२१/२०२५ व इतर संबंधित याचिकांमध्ये दिनांक ०८/०९/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयातील अनुदानित सहायक प्राध्यापक पदांकरिता पात्र उमेदवारांच्या मुलाखती निवड समितीद्वारे घेण्यात आलेल्या असून त्याप्रमाणे सर्वसाधारण गुणवत्ता यादी व निवड यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी संदर्भिय क्र.२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.एमआयएससी-२०१८/सी.आर.५६/१८/युनी-१, दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेले “UGC Regulations on Minimum Qualifications for Appointment of Teachers and Other Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education, 2018” राज्यात लागू करण्यात आले असून सदर शासन निर्णयामधील तरतुदींनुसार अध्यापकीय पदांकरिताची निवड प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील तरतुदींनुसार सहायक प्राध्यापक पदांसाठी उमेदवारांची निवड ही पूर्णतः मुलाखतीमधील कामगिरीच्या (Interview Performance) आधारे करण्यात आलेली आहे. उमेदवारांची निवड ही समितीने घेतलेल्या मुलाखतीमध्ये उमेदवारांनी ५० गुणांपैकी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे केलेली आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे,
प्रभारी कुलसचिव

संदर्भ क्र.सीसीओ/५२४८
दि.१८/१२/२०२५.